# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.12.2024** **वार–शुक्रवार**

---

**मनमोहन सिंग श्रद्धांजली**

माजी पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या पार्थिव देहावर उद्या सकाळी अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मनमोहन सिंग यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली. मनमोहन सिंग यांचं जीवन म्हणजे संघर्षाचा सामना करुन कशाप्रकारे यशाची नवी शिखरं गाठता येतात याचं उदाहरण आहे. एक प्रामाणिक व्यक्ती, उत्तम अर्थतज्ज्ञ आणि सुधारणावादी नेता म्हणून ते लोकांच्या कायम स्मरणात राहतील अशा शब्दांत पंतप्रधानांनी आदरांजली वाहिली आहे. काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह अन्य काँग्रेस नेत्यांनी, केंद्रिय मंत्र्यांनी तसंच विविध राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी सिंग यांचं अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली अर्पण केली.दरम्यान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना दोन मिनिटं मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

**क्षयरोग मोहीम**

पुणे जिल्हयात सध्या क्षयरोग रूग्ण शोध मोहीम सुरू करण्यात आली आहे. ज्या भागात क्षयरोगाचे सक्रिय रूग्ण आहेत, अशा भागात जाऊन सर्वेक्षण करण्यासाठी 262 पथकांची नेमूणक करण्यात आली असून जोखमीच्या रूग्णांचा शोध घेऊन त्यांच्यावर योग्य ते औषध उपचार करण्यात येणार आहेत. यासाठी आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची मदत घेतली जाणार असल्याचं जिल्हा परिषदेचे आरोग्य अधिकारी डॉक्टर सचिन देसाई यांनी सांगितलं.

**रेल्वे**

तळेगांव ते उरळी रेल्वे मार्गाचा प्रकल्प आराखडा तयार करण्याचं काम अंतिम टप्प्यात आलं असून हा आराखडा लवकरच रेल्वे मंत्रालयाला सादर केला जाणार आहे. या मार्गामुळे पुणे रेल्वे स्थानकावरील माल वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होईल. नवीन मार्ग चाकण रांजणगाव मार्गे जाणार असून यासाठी सुमारे 7 हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

**पाणी पुरवठा**

पुणे शहरात समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत महापालिकेकडून उभारण्यात आलेल्या नवीन 51 आणि जुन्या पाणीटाक्यांना संरक्षक भिंत घालण्यात येणार आहे. समान पाणीपुरवठा योजनेसाठी बांधण्यात आलेल्या टाक्यांच्या परिसरात अत्याधुनिक पाणी मीटर, विद्युत यंत्रणेचे साहित्य बसवण्यात आलं आहे. मात्र, तिथं संरक्षक भिंत अथवा सुरक्षारक्षक नसल्यामुळे होणारं नुकसान टाळण्यासाठी प्रशासनानं हा निर्णय घेतला आहे.

**पुरुषोत्तम करंडक**

महाराष्ट्र कलोपासक संस्थेतर्फे आयोजित पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीला आज सुरुवात झाली. महाअंतिम फेरीत 19 संघ एकांकिका सादर करणार आहेत. येत्या रविवारी संध्याकाळी ज्येष्ठ अभिनेते मनोज जोशी यांच्या हस्ते स्पर्धेचं पारितोषिक वितरण होणार आहे.

**स्वसंरक्षण**

पुण्यातल्या रायसोनी महाविद्यालयात निर्भय कन्या योजना या कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यशाळेत मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले. मुलींसाठी स्वसंरक्षण ही काळाची गरज असल्याचं मत आंतरराष्ट्रीय तायक्वांदो प्रशिक्षक सुरेश राठोड यांनी यावेळी व्यक्त केलं.

**नाणी प्रदर्शन**

इंटरनॅशनल कलेक्टर्स सोसायटी ऑफ रेअर आयटमस् तर्फे कर्वे रस्त्यावरील सोनल हॉलमध्ये 'कॉईनेक्स पुणे 2024' या राष्ट्रीय प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. आज या प्रदर्शनाचं उद्घाटन मुघल काळातील सुवर्ण नाण्यांचे संग्राहक आणि प्रसिद्ध लेखक तरूण फेरीवाल यांच्या हस्ते झालं. हे प्रदर्शन येत्या रविवारपर्यंत सकाळी 10 ते संध्याकाळी 7 या वेळेत सर्वांना विनामूल्य पाहता येईल.

**पंजाबराव देशमुख जयंती**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आज डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त कुलगुरू प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी आणि प्र - कुलगुरु प्रा. (डॉ.) पराग काळकर यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**सोमवती यात्रा**

येत्या सोमवारी जेजुरीत खंडोबाची सोमवती यात्रा भरणार आहे. सोमवारी दुपारी 1 वाजता देवाच्या पालखी सोहळ्याचं गडावरुन प्रस्थान होईल. अशी माहिती देवसंस्थानचे प्रमुख अभिजीत देवकाते यांनी काल यात्रेच्या नियोजन बैठकीनंतर दिली.

**क्रीडा**
पुणे जिल्हा फुटबॉल संघटनेच्या जिल्हास्तरीय पीडीएफए युथ लीग स्पर्धेला आज सुरूवात झाली. स्पोर्टीक्यु फुटबॉल ॲकॅडमी, अशोका फुटबॉल क्लब, सिंग्मय एफसी आणि यंग स्टेप्स् ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी सलामी दिली.

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या 14 वर्षाखालील मुलांच्या गुरू विजय दळवी करंडक आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेत वैभव क्रिकेट ॲकॅडमीने अंतिम फेरी गाठली आहे. अन्य एका सामन्यात पृथ्वी ॲकॅडमीने 22 यार्ड्स् ॲकॅडमीचा पराभव केला.

**हवामान**
पुणे आणि परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ होतं. कमाल 28 तर किमान 16 अंश सेल्सिअस तापमान नोंदवलं गेलं. उद्याही आकाश ढगाळ असेल आणि किमान तापमानात काहीशी वाढ होईल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी सहा वाजता विविध भारती पुणे केंद्रावर ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**